**मे.दि कादवा सहकारी साखर कारखाना लि,मातेरेवाडी ( राजारामनगर) मु.पो.मातेरेवाडी (राजारामनगर ) ता.दिंडोरी जि.नाशिक या साखर कारखान्याच्या प्रस्तावित ३० किलोलिटर प्रतिदिन मळीवर आधारीत आसवणी प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणीचा इतिवृतांत :**

---

मे.दि कादवा सहकारी साखर कारखाना लि , मातेरेवाडी ( राजारामनगर ) मु.पो.मातेरेवाडी ( राजारामनगर ) ता.दिंडोरी जि . नाशिक या साखर कारखान्याच्या प्रस्तावित ३० किलो लिटर प्रतिदिन मळीवर आधारीत आसवणी प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी मा .अप्पर जिल्हाधिकारी , नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दि .१६ ऑक्टोबर २०२० रोजी सकाळी ११.३० वाजता कारखाना स्थळी तसेच व्हिडीवो कॉन्फरसिंग (सिस्को वेबेक्स ॲपद्वारे घेण्यात आली .

सदर पर्यावरणविषयक जाहीर लोक सुनावणी करीता समितीचे सदस्य खालीलप्रमाणे उपस्थीत होते .

१ .अप्पर जिल्हादंडाधिकारी , नाशिक : अध्यक्ष

२. प्रादेशिक अधिकारी मप्रनि मंडळ , नाशिक : सदस्य

३. प्रभारी उपप्रादेशिक अधिकारी मप्रनि मंडळ , नाशिक : संयोजक

श्री.संजिव रेदासनी , प्रभारी उप - प्रादेशिक अधिकारी मप्रनि मंडळ , नाशिक तथा संयोजक , पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणी समिति यांनी सुरुवातीला सर्व ऊपस्थीतांचे स्वागत करुन जनसुनावणी समीती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली . तसेच सदर पर्यावरण विषयक सुनावणी करिता अवलंबिलेल्या प्रक्रीयेबाबत माहिती दिली.

पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे दि.१८/०७/२०२० रोजी प्राप्त झाला होता त्या अनुशंगाने मा . अप्पर जिल्हादंडाधिकारी , नाशिक यांनी जिल्ह्यातील कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव लक्षात घेवुन सदर पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणी प्रत्यक्ष लोक सहभागातुन व सिस्को वेबेक्स लिंक घेऊन ऑनलाईन पध्दतीने नियमांच्या अधिन राहुन व परवानगी दिलेल्या मर्यादा संख्येचे पालन करत घेणेबाबत आदेशीत केले होते.

सदर बाबतची जाहीर सुचना दि . ११/०९/२०२० रोजी दैनिक सकाळ ( मराठी ) व दी टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये देण्यात आली होती. तसेच दि.२५/०९/२०२० रोजी दैनिक सकाळ (मराठी) व दी टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये दि.१४/०९/२०२०चे केंद्रशासनाचे सुचनेप्रमाणे शुध्दीपत्रक प्रकाशित करण्यात आले होते .

उपप्रादेशिक अधिकारी तथा संयोजक,पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिति यांनी नमुद केले की, अद्याप पावेतो उपप्रादेशिक कार्यालय मप्रनि मंडळ, नाशिक यांचेकडे कुठलेही आक्षेप, टीका, टीप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात प्राप्त झालेला नाही.कोणास काही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सुनावणी दरम्यान नोंदवु शकतात..त्यानंतर प्रकल्पाचे सल्लागार यांनी प्रकल्पाबद्दल खालील मुद्यांवर सादरीकरण केले.

पर्यावरण प्रभाव मुल्यांकण आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा , पर्यावरण सद्यस्थीताचा अभ्यास,स्थानीक पर्यावरणाचा तपशिल व परिसराची माहीती,अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण , सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम,पर्यावरण व्यवस्थापन आराखडा , विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाययोजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत समाजिक आर्थिक कल्याण उपक्रम पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असुन संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात आली आहे .सदर सुनावणी दरम्यान खालीलप्रमाणे टीका टिप्पणी, आक्षेप,सूचना,नोंदविण्यात आल्या

| अ.क्र | टीका टिप्पणी, आक्षेप ,सूचना व मुद्दा | उद्योगाचे सल्लागाराने दिलेले उत्तर |
|---|---|---|
| १ | श्री.गणपतराव गंगाधर पाटील मु.पो.जऊळके वणी ) ता.दिंडोरी<br>ऊसाला जास्तीत जास्त दर मीळणेसाठी सदर कारखान्यास बायप्रॉडक्टची आवश्यकता होती . सदर प्रकल्प होत आहे हि आनंदाची गोष्ट आहे.प्रकल्पास आमच्या शुभेच्छा आहे.<br>दुषीत पाणी विहीरीमध्ये येईल का. | कंडेंसेट व स्पेंटवॉशवर प्रक्रीया करुन झीरो विसर्ग केला जाईल. |
| २ | श्री.बबनराव बाळासाहेब देशमुख मु.पो.राजापुर ता.दिंडोरी<br>आसवनी प्रकल्पाचा आमचे गावांना काय फायदा होईल | आसवानी प्रकल्पातून मिळालेल्या ऊत्पन्नामुळे उस उत्पादकांचे उसास जास्तीत जास्त भाव मिळेल. प्रकल्पातुन तयार होणारे कंपोस्ट सभासदांना ना नफा ना तोटा तत्वावर मिळेल. ११५ लोकांना प्रत्यक्ष रोजगार मिळेल. |
| ३ | श्री.भाऊसाहेब तानाजी आहेर ( उप सरपंच ) मु.पो. मातेरवाडी ता.दिंडोरी<br>आसवानी प्रकल्पामुळे हवेतील प्रदुषण होईल का ? व त्याचा काय परीणाम होईल ? | आसवानी प्रकल्पामुळे हवेत होणाऱ्या प्रदूषणासाठी १२ टन बॉयलर साठी वेट स्क्रबर या यंत्राचा वापर केला जाईल त्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निर्धारीत केलेल्या मर्यादेतच गुणवत्ता राहील.त्यामुळे वातावरणावर अनिष्ठ परीणाम होणार नाही. |
| ४ | श्री.राजेंद्र दत्तात्रय ऊफाडे ( उपसरपंच ) मु.पो.वरखेडा ता.दिंडोरी<br>आजुबाजुच्या गावातील लोकांना रोजगारसाठी समावेश होईल का ? प्रकल्प किती दिवसात पुर्ण होईल. | होय , परिसरातील (कुशल व अकुशल)लोकांना रोजगार उपलब्ध होईल.<br>पर्यावरण विषक मंजु-या मिळणेस सहा महिने लागतील व त्यानंतर आठ महिन्यात प्रकल्प पुर्ण होईल. |
| ५ | श्री.संजय दौलतराव पडोळ म.पो.वरखेडा ता.दिंडोरी<br>कारखान्यासाठी आपण जे नियोजन केले उसावर आधारित आसवानी प्रकल्पसारख्या गोष्टी शेतकऱ्यांना मान्य आहे . शेतकऱ्यांना चांगले पैसे मिळणार आहे त्यास्तही आमच्या शुभेच्छा आहे. | |

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री.दत्तु बबन गटकळ ( सरपंच ) मातेरेवाडी ता.दिंडोरी<br>प्रदुषीत पाणी शिल्लक राहिल्यास त्याची विल्हेवाट कशी लावणार | कुलींग टॉवर हि यंत्रणा बसविणार आहोत सदर पाणी रिसर्क्यूलेषण करून त्याचा पुर्नवापर करणेत येईल. नंतर इव्हॉपोरेशन होवुन वातावरणात जाईल.सिपीयु यंत्रणा चांगली असल्याने पाण्याचा १०० टक्के उपयोग होईल . |
| ७ | डॉ.योगेश बाळगीर गोसावी मु.पो.जोपुळ ता.दिंडोरी<br>स्थानिक लोकांना रोजगार मिळेल काय ? तसेच रोजगारांसाठी तांत्रीक प्रशिक्षण देणेत येईल का ? | होय, स्थानिक लोकांना रोजगार मिळेल व रोजगारांना व्हि.एस.आय.पुणे येथे कोर्सला पाठवुन प्रशिक्षीत करता येईल. |
| ८ | श्री.किसन पुंजाजी भुसाळ मु.पो. वरखेडा ता.दिंडोरी<br>आसवानीची क्षमता ३० केएलपीडी पेक्षा वाढविता येईल का ? कर्जाची रक्कम व व्याज किती कर्ज कधी फिटेल | आसवनीस ३० केएलपीडी पेक्षा जास्त ऊत्पादन घेता येणार नाही.<br>कर्ज कधी फिटेल हा प्रश्न पर्यावरण विषयक नाही. तरी पण प्रकल्पाचे कार्यक्षमतेवर कर्जाची परतफेड अवलंबुन आहे त्याबाबतची सविस्तर माहीती कारखाना प्रशासनाकडे मिळेल . |
| ९ | श्री दत्तात्रय रामचंद्र पाटील सरपंच खेडगाव ता.दिंडोरी<br>कारखान्याचे संचालक मंडळाने गेल्या १०-१२ वर्षात चांगले व्यवस्थापन , काटकसर करुन कारखान्याची प्रगती केली आहे.मागिल ४० वर्षात जे कुणी केले नाही ते, हिमतीने निर्णय घेवुन आसवनी ऊभारणी करणेचा निर्णय घेतला . त्यामुळे संपुर्ण संचालक मंडळाचे अभिनंदन व नियोजित प्रकल्पास आमच्या शुभेच्छा आहे. | |
| १० | श्री.घनशाम साहेबराव हिरे मु.पो.ऊमराळे ता.दिंडोरी<br>मोलॅसेस पासुन इथेनॉल व ज्युसपासुन इथेनॉल यामध्ये प्रदुषणात फरक असतो का ?<br>इलेक्ट्रिसीटी कशासाठी वापरणार ?<br>या ठिकाणी कामगारांना ट्रेन कोण करणार? | या दोन्ही प्रक्रियेमध्ये प्रदूषणाची पातळी हि किण्वन प्रक्रियेतील सॉलिडवर अवलंबून असते. अल्कोहलचे कन्वर्जन हे कन्व्हरटेबल शुगर वर आहे. ज्यूस ते इथेनॉल मध्ये ४ ते ५ टक्के सॉलिड असतात व मोलासेस ते इथेनॉल यामध्ये १० ते १२ टक्के सॉलिड असतात.दोन्ही पद्धतीने तयार होणारे स्पेंटवॉश आपण कंपोष्टिंग साठी वापरणार आहोत.<br>इलेक्ट्रिसिटी हि १ मेगावॅट तयार होणार असून ती आसवानी साठीच वापरली जाणार आहे. सी पी यु मध्ये प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर होणार आहे. व्ही एस आय पुणे येथे किण्वन तंत्रज्ञानावर अभ्यासक्रम आहे.व प्रशिक्षण व्ही एस आय येथे दिले जाईल. |

| | | |
|---|---|---|
| ११ | <u>प्रादेशिक अधिकारी म प्र नि मंडळ नाशिक</u> एम ई ई मध्ये स्पेंटवाश चे रिडक्शन किती होणार, प्रेसमड व स्पेंटवॉश चे प्रमाण कसे असणार. तसेच बायकंपोष्टिंग किती जागेवर करणार.मिथेन गॅस किती निर्माण होणार. | एम ई ई मध्ये स्पेंटवॉश चे रिडक्शन ८० टक्के होणार, प्रेसमड व स्पेंटवॉशचे प्रमाण १:१ राहील. व बायकंपोष्टिंग ६ एकर जागेवर करणार. |
| १२ | <u>उपप्रादेशिक अधिकारी म प्र नि मंडळ नाशिक</u> स्पेंटवाशची निर्मित्ती किती होणार, व आसवानी उभारतांना कमीत कमी स्पेंटवॉश निर्मीती होणेंकरीता तंत्रज्ञानाचा वापर करावा. | १ लीटर स्पिरीट निर्मीतीतुन १० लीटर स्पेंटवॉश निर्माण होणार आहे व आधुनिक तंत्रज्ञानावर असलेल्या आसवणी प्रकल्पाची ऊभारणी करणेचा विचार आहे. मॉनिटरींग पर्यावरण विषयक अनुमतीसाठी आवश्यक मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात आलेले आहे. |

लोकसुनावणी अध्यक्ष यांनी नमुद केले की , अजुनही कोणाला काही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडु शकतात .तसेच ऑनलाईन कोणताही टीका टिप्पणी सूचना उपस्थित केलेली नाही तदनंतर अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी यांनी उपस्थितांचे आभार मानून सादर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले .

( संजिव रेदासनी )
संयोजक तथा उपप्रादेशिक अधिकारी

( अमर दुर्गुळे )
सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ

(भागवत डोईफोडे )
अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी , नाशिक
पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती.